दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : २८ सप्टेंबर २०२६ वार : सोमवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : आश्विन ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : द्वितीया तिथी (सायंकाळी ०७:१३ पर्यंत) त्यानंतर तृतीया तिथी नक्षत्र : रेवती नक्षत्र (सकाळी १०:१५ पर्यंत) त्यानंतर अश्विनी नक्षत्र योग : ध्रुव योग (सकाळी ०८:५३ पर्यंत) त्यानंतर व्याघात योग करण : तैतुला करण (सकाळी ०८:०८ पर्यंत) त्यानंतर गराजा करण चंद्र राशी : मीन राशी (सकाळी १०:१५ पर्यंत) त्यानंतर मेष राशी सूर्य राशी : कन्या राशी अशुभ मुहूर्त: राहु काळ : सकाळी ०७:५९ ते सकाळी ०९:२९ पर्यंत

### निवृत्त एसीपीला चोरट्यांचा हिसका !

परळी : गणेश विसर्जन मिरवणुकीत शुक्रवारी चोरट्यांनी निवृत्त सहायक पोलीस आयुक्तांसह ६ जणांच्या गळ्यातील दागिने चोरल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.

गणेश विसर्जन मिरवणुकीत गर्दीचा फायदा घेऊन महिला, वृद्धांच्या गळ्यातील दागिने चोरणार्या टोळ्या सक्रीय असतात. शुक्रवारी सायंकाळपर्यंत ६ जणांच्या तक्रारीवरुन फरासखाना, विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## सारांश वृत्त

### आजपासून बँक कर्मचारी संपावर; तीन दिवस बँकिंग सेवा विस्कळीत होण्याची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

बँक कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी देशभरातील बँक कर्मचारी आजपासून सलग तीन दिवस संपावर जाणार आहेत. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या आवाहनानुसार २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान हा देशव्यापी संप होणार आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँका, जुन्या खासगी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. चेक क्लिअरन्स, रोख रक्कम काढणे-जमा करणे आणि शाखांमधील अन्य सेवांना याचा फटका बसू शकतो.

सलग पाच दिवस बँका बंद राहू नयेत आणि ग्राहकांची गैरसोय कमी व्हावी, यासाठी रविवारीही काही बँकांचे कामकाज सुरू ठेवण्यात आले. मात्र, आता तीन दिवसांच्या संपामुळे ग्राहकांना पर्यायी डिजिटल सेवांवर अवलंबून राहावे लागणार आहे. इंटरनेट आणि मोबाइल बँकिंग, यूपीआय, एटीएम आणि कॅश डिपॉझिट मशीनसारख्या सुविधा सुरू राहतील. आयसीआयसीआय, एचडीएफसी आणि ॲक्सिससारख्या खासगी बँकांच्या शाखांवर या संपाचा थेट परिणाम होणार नाही.

संपाची प्रमुख मागणी पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्याची आहे. युनियनच्या म्हणण्यानुसार मुख्य श्रम आयुक्तांसोबतच्या चर्चेत सरकारकडून याबाबत ठोस आश्वासन मिळालेले नाही. त्यामुळे कर्मचारी संघटनांनी आंदोलनाची भूमिका कायम ठेवली आहे.

याआधी ११ सप्टेंबरलाही देशव्यापी संप करण्यात आला होता. मागण्या मान्य न झाल्यास २६ ऑक्टोबरपासून अनिश्चितकालीन संपाचा इशारा युनियनने दिला आहे.

दरम्यान, वित्त मंत्रालयाने संपाचा मार्ग न स्वीकारता चर्चेतून प्रश्न सोडवण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे आता सरकार आणि बँक कर्मचारी संघटनांमधील चर्चेतून तोडगा निघतो की आंदोलन आणखी तीव्र होते, याकडे लक्ष लागले आहे.

# राज्याच्या आरोग्याची जबाबदारी आमच्यावर; मग आमच्या हक्कांची जबाबदारी कोणाची?’

## कंत्राटी महिला आरोग्य कर्मचाऱ्यांच्या वेतनातील तफावत, कामाचा अतिरिक्त भार आणि नोकरीच्या असुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

राज्याच्या आरोग्य व्यवस्थेचा भार सांभाळणाऱ्या कंत्राटी महिला आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कामाच्या परिस्थितीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. एका कंत्राटी महिला कर्मचाऱ्याने मांडलेल्या अनुभवातून वेतनातील मोठी तफावत, शारीरिक कष्ट, कामाची असुरक्षितता आणि कार्यस्थळी मिळणाऱ्या वागणुकीचा प्रश्न समोर आला आहे.

संबंधित महिलेच्या म्हणण्यानुसार, त्याच विभागात कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना सुमारे ५० हजार रुपये वेतन मिळत असताना कंत्राटी कर्मचाऱ्यांना सुमारे १४ हजार रुपये दिले जातात. हा दावा संबंधित विभागाने अधिकृत आकडेवारीसह स्पष्ट करणे आवश्यक असले, तरी समान किंवा तुलनात्मक स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातील इतकी मोठी तफावत असल्यास त्याचे कारण आणि धोरण पारदर्शकपणे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

महिलेने ‘प्रसूती रजा नको, पण समान कामासाठी समान वेतन मिळावे’, अशी मागणी केल्याचे सांगितले आहे. येथे प्रश्न केवळ एका कर्मचाऱ्याच्या वेतनाचा नाही. कंत्राटी पद्धतीने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा अटी, सामाजिक सुरक्षा, रजा, विमा, कामाचे तास आणि वेतन निश्चिती यांचे निकष काय आहेत? याचीही तपासणी होणे आवश्यक आहे.

या कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाच्या स्वरूपाबाबतही गंभीर बाबी समोर आल्या आहेत. औषधांचे बॉक्स आणण्यासाठी लांब अंतर पायी जावे लागते आणि २० ते २५ किलो वजन वाहून नेण्याची वेळ येते, असा संबंधित महिलेचा दावा आहे. तिचे स्वतःचे वजन सुमारे ४० किलो असल्याचेही तिने सांगितले आहे. हा दावा सत्य असल्यास कामाचे स्वरूप, सुरक्षितता आणि महिलांच्या आरोग्याचा विचार करून प्रशासनाने तातडीने कार्यपद्धतीची पाहणी करणे आवश्यक आहे.




आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांकडून रुग्णसेवा, औषध वितरण आणि विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडल्या जात असतील, तर त्यांच्या कामाच्या परिस्थितीची नियमित तपासणीही तितकीच महत्त्वाची आहे. आरोग्यसेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून सक्षम आरोग्य व्यवस्था उभी राहू शकते का?

कंत्राटी नोकरीची असुरक्षितता हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. ‘पुढच्या वेळी कामावर घेतील की नाही’, ही चिंता कायम असल्यास कर्मचाऱ्यांच्या मानसिक आणि आर्थिक स्थैर्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा सातत्याबाबत स्पष्ट धोरण आणि पारदर्शक निकष असणे आवश्यक आहे.

या प्रकरणातील आरोपांची स्वतंत्र प्रशासकीय चौकशी करून वेतन, कामाचे स्वरूप, सुरक्षा व्यवस्था आणि सेवा अटींबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सार्वजनिक करणे ही प्रशासनाची जबाबदारी ठरते.

कारण आरोग्य व्यवस्था केवळ रुग्णालये, औषधे आणि यंत्रांनी चालत नाही; ती चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या श्रमावरही उभी असते. त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला, सुरक्षित कामाचे वातावरण आणि सन्मान मिळणे ही केवळ प्रशासनिक गरज नाही, तर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी जोडलेली बाब आहे.

# कुणीही मदतीपासून वंचित राहणार नाही’ पण मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर कधी?

## २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर; उर्वरित भागांच्या तपासणीचे आश्वासन, मात्र अंमलबजावणीचा वेग महत्त्वाचा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नागपूर । वृत्तसंस्था

राज्यातील अपुऱ्या पावसामुळे २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. यादीत नसलेल्या तालुक्यांची तपासणी करून ‘ट्रिगर-३’ अंतर्गत मदत देण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मात्र ‘कुणीही वंचित राहणार नाही’ ही घोषणा प्रत्यक्ष मदतीत कधी उतरते, हा शेतकऱ्यांसमोरील खरा प्रश्न आहे.

दुष्काळाचे मूल्यमापन केवळ पावसाच्या आकडेवारीवर होऊ शकत नाही. पावसातील खंड, जमिनीतील ओलावा, विहिरींची पाणीपातळी, पिकांची अवस्था, चारा आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यांचाही विचार आवश्यक आहे. त्यामुळे यादीबाहेरील तालुक्यांची तपासणी किती दिवसांत आणि कोणत्या पारदर्शक निकषांवर होणार, हे सरकारने स्पष्ट करणे गरजेचे आहे. दुष्काळात वेळ अत्यंत महत्त्वाची असते. पंचनामे, पडताळणी आणि प्रशासकीय प्रक्रियेला विलंब झाला तर कागदावरील मदत शेतकऱ्याच्या संकटावर तातडीचा उपाय ठरत नाही. त्यामुळे मदतीची रक्कम, पात्रतेचे निकष आणि वितरणाची निश्चित कालमर्यादा जाहीर करणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देतानाच रब्बीसाठी उपलब्ध पाण्याचे नियोजन करताना भूजलस्थिती आणि भविष्यातील पाणीटंचाईचाही विचार करावा लागेल. हवामानातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर तात्पुरत्या मदतीसोबत चारा, पीकविमा, कर्जसवलत आणि पुढील हंगामाचे नियोजनही गरजेचे आहे. मुख्यमंत्र्यांना शेतीचा प्रत्यक्ष अनुभव आहे की नाही, हा मुख्य मुद्दा नसून शेतकऱ्यांच्या वास्तवाचे प्रशासनाला किती अचूक आकलन आहे आणि त्या आधारे किती वेगाने निर्णय घेतले जातात, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ‘कुणीही वंचित राहणार नाही’ ही हमी भाषणात नव्हे, तर पात्र शेतकऱ्याच्या खात्यावर वेळेत जमा झालेल्या मदतीत सिद्ध झाली पाहिजे.

## दुष्काळात सरकार कुठे? शरद पवारांचा फडणवीसांना १७ मागण्यांचा जाब; हेक्टरी लाख, कुटुंबाला २५ किलो धान्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांच्या प्रश्नांवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवत सरकारसमोर १७ मागण्या ठेवल्या आहेत. मात्र, या मागण्यांमुळे एक मूलभूत प्रश्नही समोर येतो दुष्काळाची परिस्थिती सरकारच्या निदर्शनास आणून देण्यासाठी पुन्हा एखाद्या राजकीय नेत्याने पत्र लिहिण्याची वेळ का यावी?

शरद पवार यांनी शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर एक लाख रुपये, तर शेतमजुरांना २५ हजार रुपये अनुदान देण्याची मागणी केली आहे. प्रत्येक दुष्काळग्रस्त कुटुंबाला २५ किलो मोफत धान्य, शेतीशी संबंधित कर्जमाफी, जमीन महसूल आणि कृषी वीजबिल माफी, फळबाग व पिकांच्या नुकसानीची भरपाई आणि थेट आर्थिक मदतीची मागणीही करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त भागात पिण्याचे आणि जनावरांसाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तहसीलदारांना टँकर मंजुरीचे अधिकार देण्याची मागणी करण्यात आली आहे. रोजगार हमीची कामे, जलसंधारणासाठी विशेष निधी आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी, वसतिगृह व मेस फी माफ करण्याची मागणीही पवारांनी केली आहे. दुष्काळाच्या परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून दसरा-दिवाळीपूर्वी मदत देण्याची मागणीही पत्रातून करण्यात आली आहे. मात्र, प्रश्न केवळ मागण्यांचा नाही. दुष्काळग्रस्तांना मदत देण्यासाठी सरकारने स्वतःहून ठोस आराखडा मांडायला हवा की विरोधकांनी सरकारला वारंवार आठवण करून द्यावी? शेतकऱ्यांच्या संकटाची तीव्रता पाहता आता पत्रव्यवहारापेक्षा निर्णय आणि प्रत्यक्ष मदत महत्त्वाची ठरणार आहे.

## १४ आक्षेपांच्या वादानंतर निवडणूक आयोगाचे नियम बदलले; मतदार यादीपासून ईसीआयनेटपर्यंत मोठे निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

निवडणूक आयोगातील कथित अंतर्गत मतभेदांच्या पार्श्वभूमीवर शनिवारी झालेल्या बैठकीनंतर आयोगाने आपल्या कामकाजाशी संबंधित नऊ महत्त्वाचे निर्णय जाहीर केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली. आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाशी संबंधित निर्णय सर्वसंमतीने झाल्याचे स्पष्ट केले.

मात्र, याच काळात संधू आणि जोशी यांनी गेल्या दहा महिन्यांत आयोगाच्या काही निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप घेतल्याचे ‘इंडियन एक्स्प्रेस’च्या तपासणीत समोर आले आहे. या आक्षेपांमध्ये मतदारांची नावे जोडणे-वगळणे, मतदार यादीच्या माहितीचा प्रवेश आणि माहिती-तंत्रज्ञान यंत्रणेच्या केंद्रीकरणासंबंधी गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. शनिवारच्या बैठकीनंतर आयोगाने ईसीआयनेट प्रणालीच्या तपासणीसाठी वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यात आयआयटी किंवा आयआयआयटीमधील स्वतंत्र तज्ज्ञाचा समावेश असेल. तसेच एसआयआरदरम्यान राहून गेलेल्या मतदारांना संबंधित अधिकाऱ्यांकडे नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज करण्याची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. आयोगाने प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्याने जारी केलेले कामाच्या पुनर्वाटपाचे आदेश लागू झाले नसल्याचेही स्पष्ट केले. मात्र, मतदार यादी, डिजिटल प्रणाली आणि अधिकाऱ्यांच्या अधिकारांबाबत निर्माण झालेले प्रश्न केवळ स्पष्टीकरणाने संपतात का, हा महत्त्वाचा मुद्दा कायम आहे. विशेषतः १४ लेखी आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकता आणि संस्थात्मक उत्तरदायित्वावर आता अधिक लक्ष राहणार आहे.

## मिशांवर ताव, अंतरवलीतून अंतर; जरांगेंच्या आंदोलनाची धार बोथट झाली का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
जालना-बीड: प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर गेल्या काही वर्षांपासून सरकारला घेरणारे मनोज जरांगे पाटील आता स्वतःच एका नव्या राजकीय आणि सामाजिक कोंडीत सापडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. आरक्षणाच्या मूळ मागणीवरून सुरू झालेला संघर्ष आता नेत्यांवरील वैयक्तिक टीका, राजकीय इशारे आणि आरोप-प्रत्यारोपांच्या भोवऱ्यात अडकतोय का, हा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. विशेष म्हणजे, ज्या अंतरवली सराटीने जरांगेंच्या आंदोलनाला राज्यव्यापी ओळख दिली, त्याच अंतरवलीतून आता आंदोलनाला जणू अंतर पडताना दिसत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जरांगे यांनी केलेल्या थेट वक्तव्यानंतर शिवसेना शिंदे गटातील नेते आणि पदाधिकारी आक्रमक झाले. ‘आमच्या मराठा समाजामुळे तुमच्या मिशा वर झाल्या होत्या, त्या खाली करायला आम्हाला वेळ लागणार नाही,’ या वक्तव्याने आरक्षणाच्या आंदोलनाची भाषा थेट राजकीय संघर्षाच्या पातळीवर गेली. याआधीही जरांगे यांनी अनेक नेत्यांवर टीका केली होती; मात्र शिंदे यांच्यावरील आक्रमक भूमिकेमुळे समीकरणांना वेगळे वळण मिळाले.

याच काळात जरांगे यांच्या निकटवर्तीयांवर करण्यात आलेले भ्रष्टाचाराचे आरोप आणि संबंधित तक्रारी यामुळे आंदोलनाच्या नैतिक भूमिकेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. हे आरोप सिद्ध झालेले नाहीत; मात्र त्यावर जरांगे समर्थकांकडून पूर्वीप्रमाणे ठोस सार्वजनिक बचाव का दिसत नाही, अशी चर्चा सुरू झाली आहे.

सर्वात महत्त्वाचा धक्का अंतरवली सराटीतून मिळाला. ज्या ठिकाणाहून मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे रणशिंग फुंकले गेले, तेथील आंदोलनस्थळ हटवण्यात आले. स्थानिक महिला आणि ग्रामस्थांनीही या निर्णयाबाबत भूमिका मांडल्याचे समोर आले आहे.

म्हणूनच प्रश्न केवळ मंडप हटवण्याचा नाही. तीन वर्षांपासून आंदोलनाचे प्रतीक असलेल्या अंतरवलीतच जर अंतर निर्माण होत असेल, तर जरांगे पाटील यांना आता आंदोलनाची दिशा, नेतृत्व आणि विश्वासार्हता या तिन्ही आघाड्यांवर नव्याने उत्तर द्यावे लागणार आहे.

# भरती परीक्षांच्या सुधारणांचा टास्क फोर्स; पण अंमलबजावणीची सूत्रे पुन्हा त्याच यंत्रणेकडे?

## नियम, मार्गदर्शक तत्त्वे तयार करून प्रश्न सुटणार का? गैरप्रकार रोखण्यासाठी ‘जबाबदारी’ निश्चित करण्याची गरज

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : : वृत्तसंस्था

राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी सरकारने उच्चस्तरीय टास्क फोर्सची स्थापना केली आहे. उमेदवार, परीक्षा संस्था आणि संबंधित घटकांकडून सूचना मागवून त्याआधारे शासनाला शिफारशी करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पुणे, नागपूर, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगरनंतर मंगळवारी मुंबईत संवाद होणार असून, त्यानंतर नाशिकमध्येही चर्चा आयोजित करण्यात आली आहे.

मात्र या संपूर्ण प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा प्रश्न टास्क फोर्सच्या बैठकींपेक्षा त्याच्या शिफारशींची अंमलबजावणी कोण करणार? हा आहे.

टास्क फोर्सकडून नियम, मार्गदर्शक तत्त्वे, सुरक्षा उपाययोजना आणि परीक्षा प्रक्रियेतील सुधारणांबाबत शिफारशी केल्या जातील. परंतु अंतिम निर्णय घेणे, नियम लागू करणे, परीक्षा यंत्रणा उभारणे, संबंधित अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे आणि गैरप्रकार झाल्यास जबाबदारी निश्चित करणे ही कामे पुन्हा सरकारच्या प्रशासकीय यंत्रणेलाच करावी लागणार आहेत. त्यामुळे ज्या प्रशासकीय व्यवस्थेतील त्रुटींमुळे भरती परीक्षा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले, त्याच व्यवस्थेने नव्या नियमांची अंमलबजावणी केली तर सुधारणा प्रत्यक्षात किती परिणामकारक ठरणार? हा उमेदवारांच्या मनातील मूलभूत प्रश्न आहे.

टास्क फोर्सने उमेदवारांचे म्हणणे ऐकणे निश्चितच आवश्यक आहे. परीक्षा केंद्रांवरील गैरसोयी, पेपरफुटी अथवा गैरप्रकारांबाबतच्या तक्रारी, तांत्रिक अडचणी, परीक्षा केंद्रांची सुरक्षा, ओळख पडताळणी, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता, निकालातील पारदर्शकता आणि तक्रार निवारण यंत्रणा यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. मात्र केवळ नियमावली तयार करून परीक्षा व्यवस्था सुरक्षित होत नाही.

नियम तोडल्यास कोणावर कारवाई होणार, तपास कोण करणार, कारवाईची मुदत काय असेल आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी कशी निश्चित केली जाणार? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे सुधारणांच्या आराखड्यात असणे आवश्यक आहे.

आजवर विविध सरकारी समित्या, चौकश्या आणि सुधारणा प्रक्रियांमधून अनेक शिफारशी झाल्या आहेत. त्यातील किती सूचना प्रत्यक्ष अंमलात आल्या, किती नियम कागदावरच राहिले आणि अंमलबजावणीत कुठे अडथळे आले, याचेही स्वतंत्र मूल्यमापन होणे गरजेचे आहे.

विशेषतः भरती परीक्षा ही लाखो तरुणांच्या भवितव्याशी संबंधित असते. एका परीक्षेतील गैरप्रकारामुळे उमेदवाराचा वेळ, पैसा आणि अनेक वर्षांची तयारी वाया जाऊ शकते. त्यामुळे ‘उमेदवाराभिमुख परीक्षा व्यवस्था’ ही केवळ घोषणेपुरती न राहता तिच्यासाठी उत्तरदायी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे.

टास्क फोर्सने सरकारला शिफारशी देणे हा सुधारणा प्रक्रियेचा पहिला टप्पा आहे; अंतिम कसोटी मात्र प्रशासनाच्या कृतीची असेल. नियम बनविणारे आणि नियम राबविणारे वेगवेगळे नसतील, तर नियमांच्या अंमलबजावणीवर स्वतंत्र देखरेख कोण ठेवणार?

गैरप्रकार झाल्यानंतर चौकशी करण्यापेक्षा गैरप्रकार होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक यंत्रणा आणि स्पष्ट उत्तरदायित्व निश्चित करणे अधिक महत्त्वाचे आहे.

उमेदवारांकडून सूचना मागविणे स्वागतार्ह आहे; पण त्यांचा आवाज अहवालात नोंदवून प्रक्रिया संपता कामा नये. टास्क फोर्सचा अहवाल सरकारच्या फाइलमध्ये बंद होणार की भरती परीक्षांच्या प्रत्यक्ष व्यवस्थेत बदल घडवणार, याचे उत्तरच या सुधारणांची खरी परीक्षा ठरणार आहे.

## संपादकीय

### कोरडा काळ आणि सरकारी ताळमेळ

महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट आता अंदाज किंवा राजकीय आरोपांचा विषय राहिलेला नाही; सरकारनेच त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुके, म्हणजेच सुमारे ७४ टक्के तालुके, दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले आहेत. हे तालुके ३२ जिल्ह्यांत पसरले असून शासनाने दुष्काळ व्यवस्थापन संहितेअंतर्गत 'ट्रिगर-१' लागू केला आहे. या निर्णयामागे पावसातील तूट आणि दीर्घ कोरडा कालावधी यांसारखे निकष आहेत.

आकडे आणखी बोलके आहेत. विदर्भातील ९५, मराठवाड्यातील ७४, उत्तर महाराष्ट्रातील ४९ आणि पुणे विभागातील ३५ तालुके दुष्काळाच्या कक्षेत आले आहेत. यवतमाळमध्ये १६, जळगावमध्ये १५, नांदेडमध्ये १४, अमरावतीमध्ये १४, अहिल्यानगरमध्ये १४, नागपूरमध्ये १४, बुलढाण्यात १३, चंद्रपूरमध्ये १२, सोलापूरमध्ये ११, बीडमध्ये ११, नाशिकमध्ये १० आणि लातूरमध्ये १० तालुक्यांचा समावेश आहे. म्हणजे संकट एखाद्या एका प्रदेशापुरते मर्यादित नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २४ सप्टेंबरला लातूर, धाराशिव आणि सोलापूरच्या दौऱ्यात परिस्थिती गंभीर असल्याचे सांगितले होते. लातूर आणि धाराशिवमध्ये यंदाचा पाऊस सामान्याच्या सुमारे निम्माच झाल्याचे त्यांनी नमूद केले होते. आता त्याच संकटाची अधिकृत नोंद २६५ तालुक्यांच्या दुष्काळ घोषणेत झाली आहे.

सरकारने १२ उपाययोजना जाहीर केल्या आहेत. पीक कर्जाचे पुनर्गठन, कृषी कर्जवसुलीला स्थगिती, जमीन महसुलात सवलत, कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काची माफी, टँकरद्वारे पाणी, चारा व धान्याची व्यवस्था आणि रोजगार हमीच्या कामांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र पीक नुकसानभरपाईची रक्कम अद्याप स्वतंत्र निर्णयानंतर ठरणार आहे. आधी पंचनामे आणि मूल्यांकन होणार आहे.

इथेच सरकारच्या ताळमेळाची खरी परीक्षा आहे.

शेतकऱ्याला कर्जाचे पुनर्गठन कागदावर नको; पुढचा हप्ता कसा भरायचा याचे उत्तर हवे. वीजबिलाला स्थगिती नकोच असे नाही; पण विहिरीत पाणी नसेल तर वीज कशासाठी? टँकरची घोषणा पुरेशी नाही; तो गावात वेळेवर पोहोचला का, याचे उत्तर हवे. चाऱ्याची तरतूद कागदावर असून उपयोग नाही; पशुधन जगले पाहिजे.

आणखी एक प्रश्न मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्णयक्षमतेसमोर उभा राहतो शेतीचा प्रत्यक्ष अनुभव नसताना शेतकऱ्याच्या जगण्याची गुंतागुंत किती खोलवर समजून घेता येते? सार्वजनिक जीवनात शेतीविषयक धोरणांवर भूमिका मांडणे आणि स्वतः शेतीच्या अनिश्चिततेत जगणे यात फरक आहे. बियाणे, खत, मजुरी, वीज, पाणी, बाजारभाव आणि कर्ज यांचा ताळमेळ शेतकरी रोज अनुभवतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ प्रशासकीय आकडे म्हणून पाहिले गेले तर धोरण आणि वास्तव यांच्यात दरी निर्माण होऊ शकते.

फडणवीस सरकारने ही दरी भरून काढायची असेल तर पंचनाम्यांपासून मदतवाटपापर्यंत प्रत्येक टप्पा पारदर्शक आणि वेळबद्ध करावा. सरकारने त्र्हड-आधारित छायाचित्रांसह पीक नुकसानीचे पंचनामे सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. आता त्या प्रक्रियेचा वेग आणि प्रत्यक्ष मदत हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

दुष्काळात 'लवकरच मदत' हा शब्द शेतकऱ्याला उपयोगाचा नसतो; खात्यावर आलेली रक्कम आणि गावात पोहोचलेले पाणी उपयोगाचे असते. २६५ तालुक्यांचा आकडा सरकारने स्वीकारला आहे. आता त्या आकड्याला प्रत्यक्ष मदतीत रूपांतरित करण्याची जबाबदारीही सरकारचीच आहे.

पाऊस सरकारच्या हातात नाही. पण पाऊस कमी पडल्यावर शेतकरी किती त्रास सहन करतो, त्याला मदत किती उशिरा मिळते आणि प्रशासन किती तत्परतेने धावते हे मात्र सरकारच्या हातात आहे.

# विसर्जन घाटांवर महापालिकेची तत्पर स्वच्छता यंत्रणा

## चार दिवसांत ६५०० मेट्रिक टन कचरा संकलित; २९४.६५५ मेट्रिक टन निर्माल्याचे स्वतंत्र संकलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाने विसर्जन घाट तसेच मिरवणूक मार्गांवर विशेष स्वच्छता यंत्रणा राबविली. २२ ते २५ सप्टेंबर या चार दिवसांत तब्बल ६५०० मेट्रिक टन कचरा संकलित करण्यात आला. यासाठी तीन हजारांहून अधिक सफाई सेवक प्रत्यक्ष मैदानात कार्यरत होते.

विसर्जन घाट आणि मिरवणूक मार्गांवर निर्माण होणारा कचरा तातडीने हटविण्यासाठी आरोग्य विभागाच्या विशेष स्वच्छता पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर गर्दी असतानाही पथकांनी सातत्याने काम करून घाट परिसर तसेच मिरवणूक मार्ग स्वच्छ ठेवले.

गणेशमूर्तींना वाहण्यात आलेली फुले, हार आणि पूजासाहित्यापासून निर्माण होणारे २९४.६५५ मेट्रिक टन निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करण्यात आले. निर्माल्य सामान्य कचऱ्यात मिसळू नये, यासाठी विसर्जन घाटांवर स्वतंत्र निर्माल्य संकलन व विलगीकरणाची व्यवस्था करण्यात आली होती.

विसर्जन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही स्वच्छता सेवकांनी तत्परतेने काम सुरू ठेवले. घाट परिसर आणि मिरवणूक मार्गांवरील कचरा हटवून परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यामुळे



विसर्जनानंतरची स्वच्छता व्यवस्था सुरळीतपणे राबविण्यात आली.

महापालिकेचे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले की, गणेशोत्सव आणि विसर्जन काळात शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आरोग्य विभागाची पथके सातत्याने कार्यरत होती. घाट परिसरात नागरिकांना आवश्यक स्वच्छता सुविधा तत्परतेने उपलब्ध करून देण्यासाठी पथके प्रत्यक्ष ठिकाणी तैनात करण्यात आली होती. नागरिकांनीही कचरा रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी न टाकता त्याचे योग्य विलगीकरण करून महापालिकेच्या संकलन व्यवस्थेकडे द्यावे.

शहराची स्वच्छता राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

गणेशोत्सव काळात नागरिकांनी महापालिकेच्या स्वच्छता यंत्रणेला दिलेल्या सहकार्यामुळे विसर्जनानंतरची स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यास मदत झाली. यापुढेही नागरिकांनी महापालिकेच्या स्वच्छता यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले.

# चिंचवडमधील विसर्जन मिरवणुकीदरम्यान वाहतूक सुरळीत

## निगडी वाहतूक विभागाचा 'ट्रॅफिक प्लॅन' यशस्वी; मध्यरात्रीपर्यंत कर्मचारी, वॉर्डन रस्त्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

चिंचवडमधील गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान निर्माण होणारी गर्दी आणि संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेऊन निगडी वाहतूक विभागाने आखलेला विशेष 'ट्रॅफिक प्लॅन' प्रभावी ठरला. प्रमुख चौक, मिरवणूक मार्ग आणि गर्दीच्या ठिकाणी वाहतूक कर्मचारी तसेच वॉर्डन प्रत्यक्ष रस्त्यावर तैनात राहिल्याने वाहतूक व्यवस्था शिस्तबद्ध आणि सुरळीत ठेवण्यात आली.




गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान वाहनांची मोठी संख्या वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांनी आधीच नियोजन केले होते. आवश्यकतेनुसार काही मार्गांवरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. त्यामुळे मिरवणुकीच्या मार्गावर होणारी संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यास मदत झाली.

**मध्यरात्रीपर्यंत कर्तव्यावर**

विसर्जन मिरवणूक सुरू असताना वाहतूक कर्मचारी आणि वॉर्डन प्रमुख चौकांमध्ये तसेच संवेदनशील ठिकाणी तैनात होते. मिरवणूक पुढे सरकत असताना त्यानुसार वाहतुकीचे नियमन करण्यात आले. मध्यरात्रीपर्यंत कर्मचारी रस्त्यावर कर्तव्य बजावत होते.

रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना अडथळा निर्माण होऊ नये, याचीही वाहतूक पोलिसांनी विशेष काळजी घेतली. गर्दीच्या ठिकाणी वाहनांची हालचाल नियंत्रित करताना नागरिकांना आणि वाहनचालकांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

**वाहनचालकांकडून पोलिसांचे कौतुक**

वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करत वाहनचालकांनीही सहकार्य केले. नियोजनबद्ध वाहतूक व्यवस्थेमुळे विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठी कोंडी टाळता आल्याने वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले. मध्यरात्रीपर्यंत रस्त्यावर राहून वाहतूक सुरळीत ठेवणाऱ्या निगडी वाहतूक विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि वॉर्डन यांचे नागरिकांनी आभार मानले.

# भोसरीतील फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यानेच रक्कम लाटली

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

उन्नती फिनसर्व प्रा. लि.च्या भोसरी शाखेत गोल्ड लोन अधिकारी म्हणून काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने ग्राहकांकडून कर्ज खाते बंद करण्यासाठी रोख स्वरूपात घेतलेली रक्कम कंपनीकडे जमा न करता स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात कंपनीचे तब्बल ३५ लाखांपेक्षा अधिकचे आर्थिक नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



हा प्रकार मे २०२३ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घडल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी सुयोग संजय गायकवाड (वय ३०, रा. नवी मुंबई) यांनी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादीच्या माहितीनुसार, आरोपी अक्षय धर्मराज महामुलकर हा संबंधित फायनान्स कंपनीत गोल्ड लोन अधिकारी म्हणून कार्यरत होता.

त्याने ग्राहकांकडून कर्ज खाते बंद करण्यासाठी आवश्यक रक्कम रोख स्वरूपात स्वीकारली. मात्र, ही रक्कम कंपनीकडे जमा न करता स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरल्याचा आरोप आहे. त्यामुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाले. याप्रकरणी भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक टापरे करीत आहेत.

# माथाडी पदाधिकाऱ्यांचा राज्यस्तरीय मेळावा २९ सप्टेंबरला

## १४ जिल्ह्यांतील ६ हजारांहून अधिक पदाधिकारी सहभागी होणार; २०३० पर्यंत ३० हजार पदाधिकारी जोडण्यावर विचारविनिमय

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी




ारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियन (रजि.) यांच्या वतीने मंगळवारी (दि. २९) चिंचवड येथील ऑटो क्लस्टरमध्ये राज्यस्तरीय माथाडी पदाधिकारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास राज्यातील १४ जिल्ह्यांमधील सहा हजारांहून अधिक माथाडी पदाधिकारी सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनुप अविनाश मोरे यांनी रविवारी (दि. २७) काळेवाडी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

मेळाव्याचे उद्घाटन मंगळवारी दुपारी दोन वाजता रवींद्र दादा चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. माथाडी कामगारांच्या रोजगार, सुरक्षितता, सामाजिक सुरक्षा आणि कल्याणाशी संबंधित विविध विषयांवर यावेळी चर्चा करण्यात येणार आहे. तसेच संघटना अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि कामगारांच्या समस्या प्रभावीपणे सोडविण्यासाठी आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत पदाधिकाऱ्यांमध्ये विचारविनिमय होणार आहे.

**३० हजार पदाधिकारी जोडण्याचे लक्ष्य**

संघटनेच्या विस्तारासाठी २०३० पर्यंत ३० हजार पदाधिकाऱ्यांना संघटनेशी जोडण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक नियोजन, संघटनात्मक विस्तार आणि आगामी उपक्रमांवर मेळाव्यात चर्चा होणार असल्याचे अनुप मोरे यांनी सांगितले.

**बेरोजगारांसाठी रोजगार महाकुंभ**

दरम्यान, बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभा'चे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात पिंपरी-चिंचवड परिसरातील विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता आणि कौशल्यानुसार थेट मुलाखतीद्वारे नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पाचवी उत्तीर्ण उमेदवारांपासून उच्चशिक्षित युवकांपर्यंत पात्र उमेदवारांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मेळाव्यात सहभागी होऊनही तात्काळ नोकरीची संधी न मिळालेल्या उमेदवारांसाठी 'जॉब कार्ड' उपक्रम राबविण्यात येणार असून, त्याद्वारे भविष्यातील रोजगाराच्या संधींसाठी उमेदवारांची नोंद ठेवण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर टँकरच्या धडकेने तरुणाचा जागीच मृत्यू

ठिकाण: मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, फूड मॉलच्या विरुद्ध बाजू (मावळ)

पोलीस ठाणे: शिरगाव चौकी

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बंदी असतानाही कोणतीही पार्किंग दिवा वा इशारा न लावता रस्त्यावर उभ्या केलेल्या टँकरला (चक ४७ इध ४६०२) बलेनो कारने मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ३४ वर्षीय कारचालक चिराग सुरेश धाद्रोड यांचा जागीच मृत्यू झाला. टँकरचालक रामेंद्रकुमार याच्याविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**पिंपळे सौदागरमध्ये हल्दीराम शॉप फोडले; तिजोरीसह रोकड लंपास**

ठिकाण: स्मार्ट १८ मॉल, पिंपळे सौदागर

पोलीस ठाणे: काळेवाडी

मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने हल्दीराम शॉपच्या डिलिव्हरी विंडोचे लॉक तोडून आत प्रवेश केला. दुकानातील गोदरेज कंपनीची तिजोरी आणि त्यातील रोख रकमेसह एकूण २८,३०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी महेश कदम यांनी फिर्याद दिली आहे.

**खराळवाडीत पदपथावरून दुचाकी लंपास**

ठिकाण: महिंद्रा नेस्टाल्जीया बिल्डिंगजवळ, खराळवाडी, पिंपरी

पोलीस ठाणे: संत तुकाराम नगर

फिर्यादी महेश येळूरकर यांनी आपली ३५ हजार रुपये किमतीची हिरो होंडा स्प्लेंडर (चक १२ णद ८३७१) पदपथावर लॉक करून उभी केली होती. अज्ञात चोरट्याने संधी साधून ही दुचाकी चोरून नेली.

या सर्व प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस अधिकारी करत आहेत.

**भोसरी कचरा डेपोसमोर किरकोळ वादातून डोक्यात दगड घालून तरुणाला केले जखमी**

ठिकाण: कचरा डेपो, गवळीमाथा, भोसरी

पोलीस ठाणे: एमआयडीसी भोसरी

कचरा डेपो समोरील भंगार दुकानासमोर बसलेल्या राजू गायकवाड यांच्यावर आरोपी ब्रुसली उर्फ जणम विक्रम शहा याने किरकोळ कारणावरून वाद घालत रागाच्या भरात डोक्यात दगड मारून गंभीर जखमी केले. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अखेरच्या ५० मीटरमध्ये जीवाचं रान केलं अन् भारताच्या लेकीनं पदकावर कोरलं नाव!

■ टोकियो : प्रतिनिधी

भारताच्या प्राची चौधरीने शनिवारी महिलांच्या ४०० मीटर अंतिम फेरीत कांस्यपदक जिंकले. या पदकासह जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताच्या पदकांची संख्या ३० वर पोहोचली आहे. या शर्यतीत बहरीनच्या सलवा ईद नासेरने सुवर्णपदक पटकावत आशियाई क्रीडा स्पर्धेचा विक्रम मोडला. सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्चस्व राखत तिने दमदार कामगिरीसह शर्यत जिंकली.

२९ वर्षीय भारतीय धावपटू प्राची चौधरीने ५३.२१ सेकंदांची वेळ नोंदवत कांस्यपदक पटकावले. तिने अखेरच्या ५० मीटर अंतर कापताना जीवाचं रानं करत दक्षिण कोरियाच्या किम सेयून हिला मागे टाकले. किमने ५३.३८ सेकंदांची वेळ नोंदवत चौथे स्थान मिळवले. दोघींच्यात फक्त १७ सेकंदाचे अंतर राहिले. प्राचीची ५३.२१ सेकंदांची वेळ तिच्या यंदाच्या सर्वोत्तम कामगिरीपेक्षा कमी राहिली. तिने ऑगस्ट २०२६ मध्ये भुवनेश्वर येथे झालेल्या World Athletics Continental Tour Silver स्पर्धेत ५२.७७ सेकंदांची वेळ नोंदवली होती. तिची ४०० मीटरमधील वैयक्तिक सर्वोत्तम वेळ ५२.४० सेकंद असून, तिने ही कामगिरी २०२३ मध्ये केली होती. या कांस्यपदकासह प्राचीच्या नावावर आशियाई क्रीडा स्पर्धेतील दुसरे पदक जमा झाले आहे. २०२३च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने महिलांच्या ४x४०० मीटर रिले संघासोबत रौप्यपदक जिंकले होते. या शर्यतीतील दुसरी भारतीय धावपटू किरण पहाल हिने ५३.४१ सेकंदांची वेळ नोंदवत पाचवे स्थान मिळवले.

# निवडणूक आयोगाविरोधात शिवसेना उबाठाचे आंदोलन

## ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी; निवडणूक प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने पिंपरी-चिंचवडमध्ये आंदोलन करण्यात आले. शहराध्यक्ष चेतन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. आंदोलकांनी कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली.




चेतन पवार यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत, आयोगाने निष्पक्षपणे काम करण्याबाबत नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण करणे आवश्यक असल्याचे म्हटले. त्यांच्या आरोपानुसार, आयोगाच्या काही निर्णयांमुळे निवडणूक प्रक्रियेबाबत संशय निर्माण झाला आहे. तसेच आयोगाकडून करण्यात येणारी वक्तव्ये आणि कथित असंवैधानिक भाषेचा आंदोलकांनी निषेध केला.

निवडणूक आयोगाच्या सध्याच्या कार्यपद्धतीवर देशभरातही राजकीय वाद सुरू आहे. विशेषतः मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण (ड्खठ) प्रक्रियेशी संबंधित निर्णयांवर निवडणूक आयुक्तांमध्ये मतभेद असल्याचा वृत्तांत अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी काही निर्णयांवर लेखी आक्षेप नोंदवले होते.

या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मात्र अंतिम निर्णय एकमताने घेतले जात असल्याचे स्पष्ट केले आहे.

ज्ञानेश कुमार हे १९ फेब्रुवारी २०२५ पासून भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त आहेत, अशी माहिती आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर आहे.

शिवसेना उबाठाच्या आंदोलकांनी निवडणूक आयोगाने आपल्या भूमिकेबाबत स्पष्टता द्यावी, निवडणूक प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी पारदर्शकता वाढवावी आणि उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, अशी मागणी केली.

# यशवंत कारखान्याच्या कामगारांचे थकीत वेतन, शेतकऱ्यांचे ऊस बिल लवकरच मिळणार

## अध्यक्ष सुभाष जगताप यांची ग्वाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

थेऊर । प्रतिनिधी

थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्यातील कामगारांचे थकीत वेतन आणि शेतकऱ्यांचे प्रलंबित ऊस बिल लवकरात लवकर देण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण ग्वाही कारखान्याचे अध्यक्ष सुभाष जगताप यांनी दिली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वेतनाची आणि ऊस बिलाची प्रतीक्षा करणाऱ्या परिसरातील शेतकरी व कामगारांना या घोषणेमुळे मोठा दिलासा मिळाला आहे.




यशवंत सहकारी साखर कारखाना हा स्थानिक शेतकरी आणि कामगारांच्या दृष्टीने महत्त्वाचा आर्थिक आधारस्तंभ आहे. मात्र, गेल्या काही काळापासून कामगारांचे वेतन आणि शेतकऱ्यांच्या ऊस बिलाचा प्रश्न प्रलंबित असल्याने संबंधितांमध्ये चिंतेचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर अध्यक्ष सुभाष जगताप यांनी कारखान्याची आर्थिक घडी मजबूत करून थकीत देणी देण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय व कायदेशीर कारवाई सुरू असल्याची भूमिका स्पष्ट केली आहे. कारखाना सध्या अडचणीच्या परिस्थितीतून मार्ग काढत असून कामगार आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताला आमचे सर्वोच्च प्राधान्य राहील, असे जगताप यांनी सांगितले. तसेच भविष्यात कामगारांचे वेतन आणि शेतकऱ्यांची देणी वेळेत देण्यासाठी ठोस नियोजन करण्यात येत असून, कामगारांच्या घामाचे मोल आणि शेतकऱ्यांच्या उसाचा योग्य मोबदला वेळेत मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षांच्या या आश्वासनानंतर आता प्रत्यक्ष रक्कम कधी जमा होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, कामगार व शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 'सक्षम यशदा' उपक्रमांतर्गत यशदामध्ये आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

यशदा (YASHA¦A) मधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'सक्षम यशदा' उपक्रमांतर्गत आणि राष्ट्रीय आयुर्वेद दिनाचे औचित्य साधून एका विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर प्रकृति आयुर्वेद पंचकर्म क्लिनिक, औंध यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. या शिबिरात यशदा मधील ६० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, उपमहासंचालक सचिन कलंतरे, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आणि डॉ. हेमंत वसेकर प्रामुख्याने उपस्थित होते. शिबिरादरम्यान डॉ. समीर भाले आणि डॉ. तेजस्विनी भाले-बोरसे यांनी सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नाडी परीक्षा (Pulse ¦iagnosis) करून विविध आरोग्य तपासण्या केल्या, तसेच आवश्यक औषधांचे मोफत वाटप केले.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. तेजस्विनी भाले-बोरसे यांनी आपल्या २२ वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे 'आपल्या आरोग्याला प्रथम प्राधान्य का द्यावे?' या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी दैनंदिन आहार, जीवनशैलीतील बदल आणि पंचकर्माचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. तसेच प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्र असलेल्या आयुर्वेदाच्या माध्यमातून आजारांचे निवारण व आरोग्य संवर्धनाचे उपाय सांगितले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी निबंधक राजीव नंदकर आणि डॉ. राजेंद्र जोशी यांनी विशेष मार्गदर्शन केले. यशदाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# खडकवाडीत तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात

## विजेत्या संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड; खेळाडूंचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी। प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद, पुणे आणि आंबेगाव तालुका क्रीडा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन माध्यमिक विद्यालय, खडकवाडी येथे करण्यात आले होते. गुरुवार (दि. २४) ते शनिवार (दि. २६) असे तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत आंबेगाव तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

शनिवार (दि. २६) रोजी स्पर्धेची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली. विविध वयोगटांतील विजेत्या संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

**मुलींच्या गटातील विजेते**

**१४ वर्षे वयोगट :**

प्रथम – माध्यमिक विद्यालय, खडकवाडी

द्वितीय – पं. ज. नेहरू माध्यमिक व द. गो. वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, निरगुडसर

तृतीय – न्यू इंग्लिश स्कूल, लाखनगाव

१७ वर्षे वयोगट :

प्रथम – महात्मा गांधी विद्यालय, मंचर

द्वितीय – जनता विद्या मंदिर, घोडेगाव

तृतीय – न्यू इंग्लिश स्कूल, लाखनगाव

**१९ वर्षे वयोगट :**

**प्रथम – भैरवनाथ विद्यालय, शिंगवे**

द्वितीय – पं. ज. नेहरू माध्यमिक व द. गो. वळसे पाटील ज्युनिअर कॉलेज, निरगुडसर

तृतीय – जनता विद्या मंदिर, घोडेगाव

**मुलांच्या गटातील विजेते**

**१४ वर्षे वयोगट :**

प्रथम – विद्या विकास मंदिर, अवसरी

द्वितीय – न्यू इंग्लिश स्कूल, लाखनगाव

तृतीय – पं. ज. नेहरू माध्यमिक व द. गो. वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, निरगुडसर

**१७ वर्षे वयोगट :**

प्रथम – महात्मा गांधी विद्यालय, मंचर

द्वितीय – जनता विद्या मंदिर, घोडेगाव

तृतीय – लालबहादूर शास्त्री विद्यालय, अमोंडी

**१९ वर्षे वयोगट :**

प्रथम – संगमेश्वर विद्यालय, पारगाव

द्वितीय – डेक्कन मराठा ज्युनिअर कॉलेज, लांडेवाडी

सर्व विजेत्या संघांना मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी माजी सरपंच अनिल डोके, तालुका क्रीडा अधिकारी रोहिणी पालवे, सल्लागार समितीचे अध्यक्ष दिलीप आप्पा डोके, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण ज्ञानेश्वर वाळुंज, उपाध्यक्ष उद्धव नाथा धुमाळ, माजी तंटामुक्ती अध्यक्ष एकनाथ सुक्रे, चांगदेव सुक्रे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्रीराम वाळुंज, गुलाब वाळुंज आदी उपस्थित होते.




स्पर्धेच्या नियोजनात जिल्हा परिषद मॉडेल स्कूलच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेखर आत्माराम सुक्रे, वैभव नाथा सुक्रे, विशाल हरिभाऊ धुमाळ, अतुल धुमाळ, राहुल भोर, शिल्पा पोखरकर, प्रवीण पोखरकर, आंबेगाव तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष प्रवीण हिंगे, खजिनदार भरत खिल्लारी, क्रीडा शिक्षक मिलिंद सैद, मुख्याध्यापक नवल पगार तसेच शाळेतील शिक्षक व सेवकांनी योगदान दिले.

खेळाडूंसाठी दोन दिवस खडकवाडी ग्रामस्थांच्या वतीने भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. स्पर्धेचे सूत्रसंचालन शेखर सुक्रे यांनी केले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल आयोजकांचे तसेच विजेत्या संघांचे, खेळाडूंचे आणि मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.

# बँकेच्या निवडणुकीत कट्टर विरोधक एकत्र; नगरच्या राजकारणात सहकाराच्या नावाखाली नवी जुळवाजुळव?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

अहिल्यानगर : प्रतिनिधी

विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये एकमेकांविरोधात राजकीय संघर्ष करणारे अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक दिग्गज नेते आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने एकाच व्यासपीठावर आले आहेत. संगमनेर येथे रविवारी झालेल्या बैठकीत विविध पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी आणि सहकार क्षेत्रातील पदाधिकारी एकत्र दिसल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात या बैठकीची चर्चा रंगली आहे.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. बँकेची सहकाराची आणि राजकारणविरहित वाटचाल कायम ठेवण्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

मात्र, ज्यांच्या राजकीय भूमिका परस्परविरोधी आहेत, तेच नेते सहकारी बँकेच्या सत्तावाटपासाठी एकत्र येत असतील, तर ही केवळ सहकाराची गरज आहे की राजकीय गणितांची जुळवाजुळव, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. निवडणूक बिनविरोध करण्यामागे सहकार क्षेत्रातील स्थैर्याचा मुद्दा पुढे केला जात असला, तरी बिनविरोध निवडणुकीत मतदारांचा थेट कौल आणि स्पर्धेची प्रक्रिया मर्यादित होते, हा मुद्दाही दुर्लक्षित करता येणार नाही.

जिल्हा बँक ही शेतकरी, सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची वित्तीय संस्था आहे. त्यामुळे बँकेचे कामकाज पारदर्शक, सक्षम आणि शेतकरीकेंद्री राहणे हीच खरी कसोटी ठरणार आहे. निवडणूक झाली किंवा बिनविरोध झाली, तरी संचालक मंडळाकडून बँकेच्या कारभाराबाबत उत्तरदायित्व अपेक्षित राहणार आहे.

बैठकीला माजी मंत्री बाळासाहेब थोरात, शंकरराव गडाख, माजी खासदार सुजय विखे पाटील, माजी आमदार सुधीर तांबे यांच्यासह आशुतोष काळे, विवेक कोल्हे, संग्राम जगताप, हेमंत ओगले, विक्रम पाचपुते, प्राजक्त तनपुरे, काशिनाथ दाते, अक्षय कर्डिले आदी आमदार उपस्थित होते.

राजकीय रणांगणात विरोधक, पण जिल्हा बँकेसाठी एकत्रआता या ऐक्याचा फायदा नेमका सहकाराला होतो की सत्तेच्या समीकरणांना, याकडे लक्ष लागले आहे.

# निवृत्त एसीपीला चोरट्यांचा हिसका! विजर्सन मिरवणुकीत ६ जणांच्या गळ्यातील दागिने चोरट्यांनी लांबविले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

अहिल्यानगर : प्रतिनिधी

गणेश विसर्जन मिरवणुकीत शुक्रवारी चोरट्यांनी निवृत्त सहायक पोलीस आयुक्तांसह ६ जणांच्या गळ्यातील दागिने चोरल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.

गणेश विसर्जन मिरवणुकीत गर्दीचा फायदा घेऊन महिला, वृद्धांच्या गळ्यातील दागिने चोरणार्या टोळ्या सक्रीय असतात. शुक्रवारी सायंकाळपर्यंत ६ जणांच्या तक्रारीवरुन फरासखाना, विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

निवृत्त सहायक पोलीस आयुक्त लक्ष्मण महादेव बोराटे (वय ६२, रा. समर्थ बंगला, बालेवाडी) यांनी फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ते छत्रपती शिवाजी महाराज रोडवरील बेलबाग चौकात शुक्रवारी दुपारी सव्वा वाजता विसर्जन मिरवणुक पहात होते. त्यावेळी गर्दीचा गैरफायदा घेऊन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ३ तोळ्यांची सोनसाखळी हातचलाखीने चोरुन नेली. पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पाटोळे तपास करीत आहेत.

अनिल विठ्ठल कुंभारे (वय ६१, रा. माळवाडी, हडपसर) हे बेलबाग चौकातील मुलचंद मीलच्या दुकानासमोरील फुटपाथवर शुक्रवारी दुपारी १२ वाजता उभे होते. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील १ लाख रुपयांची २० ग्रॅमची सोनसाखळी चोरुन नेली.

राहुल भाऊसाहेब पठाडे (वय ३८, रा. भूगाव) हे विसर्जन मिरवणुकीसाठी कुंट चौकात शुक्रवारी सायंकाळी उभे असताना चोरट्यांनी १ लाख रुपयांची १४ ग्रॅमची सोनसाखळी नकळत चोरुन नेली.

सुमीत शिरीष देशपांडे (वय ३४, रा. आंबेगाव) हे कुंटे चौकात असताना सायंकाळी सव्वापाच वाजता त्यांच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोनसाखळी चोरट्यांनी लांबविली.

हार्दिक प्रविण मुंदडा (वय ३०, रा. हिंजवडी) हे २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता लक्ष्मी रोडवरील गणपती चौकात मिरवणुक पहात होते. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील दीड लाख रुपयांची २४ ग्रॅम वजनाची सोनसाखळी चोरुन नेली.

अभिषेक सुरेश पोटोळे (वय २३, रा. आंबेगाव पठार) हे शुक्रवारी रात्री साडेआठ वाजता गुरुजी तालीमजवळ विसर्जन मिरवणुकीचे फोटो काढत असताना एकाचा धक्का लागला. त्यामध्ये बाचाबाची होऊन त्याच्या साथीदाराने पोटोळे यांच्या हातातील मोबाईल हिसकावुन चोरुन नेला.

## सारांश वृत्त

### हजारोंची गर्दी अन् 'जय गणेश'चा जयघोष..! 'दगडूशेठ' बाप्पांच्या सांगता मिरवणुकीने पुणे दुमदुमले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

श्रीमंत दगडूशेठ गणपती की जय मोरया, मोरया जय गणेश... गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात आणि हजारो भक्तांच्या उपस्थितीत 'दगडूशेठ' गणपती बाप्पांची श्री वक्रतुंड रथातून वैभवशाली सांगता मिरवणूक पार पडली. अनंत चतुर्दशीला रात्री ८ वाजून २५ मिनिटांनी पांचाळेश्वर घाटावरील हौदात मूर्तीचे विसर्जन करून बाप्पाला निरोप देण्यात आला.

सलग चौथ्या वर्षी दुपारी ४ वाजता बेलबाग चौकातून विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला. त्यावेळी लाडक्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी गणेशभक्तांनी अलोट गर्दी केली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३४ व्या वर्षानिमित्त आयोजित गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक अनंत चतुर्दशीला थाटात निघाली.

तर, सायंकाळी ७.३० वाजता टिळक चौकात मुख्य विसर्जन रथाचे आगमन होताच हा क्षण डोळ्यात साठविण्यासाठी गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे आणि पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी रथाचे सारथ्य देखील यावेळी केले.

श्री वक्रतुंड रथाची मांडणी यंदाची प्रतिकृती असलेल्या वृंदावनमधील प्रेम मंदिराच्या विषयाप्रमाणे करण्यात आली होती. मंदिर वास्तुकलेने प्रेरित असा हा रथ तयार करण्यात आला. रथाची संकल्पना भारतीय मंदिर वास्तु केलेवर आधारित असून त्यात पारंपरिक शिल्पकला आणि आधुनिक फॅब्रिकेशनचा सुंदर संगम भाविकांना पाहायला मिळाला. मिरवणुकीत 'जय गणेश अमली पदार्थ मुक्त भारत अभियान' जनजागृती करणारा 'मानवसेवा रथ' अग्रभागी होता. त्यामध्ये विनायक आणि रोहन देवळणकर यांचा चौघडा व प्रमोद गायकवाड यांचे सनई वादन झाले.

# यूपीआयवर शुल्क लादताच व्यापाऱ्यांचा एल्गार! २ ऑक्टोबरला 'नो यूपीआय डे'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

डिजिटल व्यवहारांना चालना देणाऱ्या यूपीआय व्यवस्थेवर शुल्क आकारण्याच्या निर्णयाविरोधात देशभरातील मोबाईल फोन विक्रेते आक्रमक झाले आहेत. दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या व्यापारी यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के शुल्क लागू करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ २ ऑक्टोबर रोजी 'नो यूपीआय डे' पाळण्यात येणार आहे. गांधी जयंतीच्या दिवशी यूपीआयद्वारे होणारे व्यवहार प्रतीकात्मकरीत्या बंद ठेवून या शुल्काविरोधात आवाज उठवण्याची तयारी विक्रेत्यांनी केली आहे.

ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या (एआयएमआरए) दिल्ली-एनसीआर विभागातील पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनाची माहिती दिली. आंदोलनादरम्यान व्यापारी दुकानांमधील यूपीआय क्यूआर कोड काळ्या कापडाने झाकणार असून, ग्राहकांकडून यूपीआय पेमेंट स्वीकारले जाणार नाही. डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून व्यवहार करणाऱ्या ग्राहकांना त्यामुळे पर्यायी भुगतान पद्धतींचा वापर करावा लागू शकतो.

सरकारने १५ ऑक्टोबरपासून दोन हजार रुपयांपेक्षा अधिक



रकमेच्या व्यापारी यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के शुल्क लागू करण्याची तरतूद केली आहे. मात्र, व्यक्तींकडून व्यक्तींना केल्या जाणाऱ्या व्यवहारांना तसेच छोट्या रकमेच्या देयकांना या शुल्कातून वगळण्यात आले आहे. या निर्णयामुळे व्यापाऱ्यांच्या व्यवहार खर्चात वाढ होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. विशेषतः मोबाईलसारख्या महागड्या वस्तूंच्या खरेदीवेळी यूपीआयद्वारे मोठ्या रकमेचे व्यवहार करणाऱ्या ग्राहकांवरही या बदलाचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणाऱ्या व्यवस्थेतच शुल्काचा मुद्दा आता वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. व्यापाऱ्यांचा विरोध लक्षात घेता, शुल्काबाबत सरकार आणि संबंधित यंत्रणा काय भूमिका घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

## नीट पेपरफुटीचा धसका! एनटीएच्या सुरक्षेसाठी आता सीआयएसएफचा पहारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

नीट-यूजी परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणानंतर राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेच्या (एनटीए) कारभारावर निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर आता संस्थेच्या सुरक्षेसाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाची (सीआयएसएफ) नियुक्ती करण्यात येणार आहे. एनटीएच्या कार्यालयातील अतिसंवेदनशील आणि गोपनीय विभागांमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक कठोर करण्याचा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला आहे. मात्र, परीक्षेच्या गोपनीयतेसाठी आता केंद्रीय सुरक्षा दलाचा पहारा आवश्यक ठरत असेल, तर यंत्रणेतील त्रुटींची व्याप्ती किती गंभीर आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नीट-यूजी प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणामुळे यंदा देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती. परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकार आणि प्रशासकीय हलगर्जीपणाविरोधात विद्यार्थ्यांनी देशव्यापी आंदोलने केली. या प्रकरणाचे राजकीय पडसादही उमटले आणि तत्कालीन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला.

या वादानंतर एनटीएने आपले कामकाज नव्या कार्यालयात हलवले आहे. आता कार्यालयाच्या सुरक्षेची जबाबदारी सीआयएसएफकडे सोपवण्यात येणार असून, विशेषतः प्रश्नपत्रिकांशी संबंधित गोपनीय विभागांवर कडक देखरेख ठेवली जाणार आहे.

मात्र, केवळ सुरक्षा वाढवून परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित होणार का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रश्नपत्रिकांची गोपनीयता, प्रशासकीय जबाबदारी आणि गैरप्रकार रोखण्याची यंत्रणेची क्षमता यांबाबत ठोस सुधारणा झाल्याशिवाय विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करणे कठीण ठरणार आहे.

## सणासुदीआधी ग्राहकांना तिसरा महागाईचा झटका; एसी, टीव्ही, फ्रीज महागणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

गुवाहाटी : प्रतिनिधी

नवी दिल्ली : दसरा आणि दिवाळीच्या खरेदीची तयारी करणाऱ्या ग्राहकांना यंदा पुन्हा महागाईचा झटका बसण्याची शक्यता आहे. १ ऑक्टोबर २०२६पासून एसी, टीव्ही, वॉशिंग मशीन, फ्रीज आणि अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या किमती वाढण्याची शक्यता असून, इलेक्ट्रॉनिक्स उद्योगासाठी ही वर्षातील तिसरी दरवाढ ठरणार आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात घरगुती उपकरणांची खरेदी ग्राहकांच्या बजेटवर अतिरिक्त भार टाकू शकते.




कंपन्यांकडून इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या किमतींमध्ये ४ ते १० टक्क्यांपर्यंत वाढ केली जाऊ शकते. एसीच्या किमती ५ ते ८ टक्क्यांनी, तर वॉशिंग मशीन, फ्रीज आणि एलईडी टीव्हीच्या किमती ३ ते ४ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. काही कंपन्यांनी आधीच दरवाढ लागू केल्याचेही वृत्त आहे.

या दरवाढीमागे तांबे, ॲल्युमिनिअम आणि कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती, क्रूड ऑइलशी संबंधित उत्पादनांचा वाढलेला खर्च, वाहतूक खर्च, रुपयाची घसरण आणि आखाती भागातील युद्धजन्य परिस्थिती ही प्रमुख कारणे सांगितली जात आहेत.

ब्लू स्टार, गोदरेज अप्लायन्सेस, हायर आणि डायकिन यांसारख्या कंपन्यांनी दरवाढीला दुजोरा दिल्याचे सांगितले जात आहे. एलजी आणि बॉश होम कम्फर्टने एसीच्या किमतीत सुमारे ५ टक्के वाढ केली आहे, तर पॅनासोनिककडून दरवाढीचा आढावा घेतला जात आहे.

ब्लू स्टारचे व्यवस्थापकीय संचालक बी. थियागराजन यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या वर्षाच्या तुलनेत उत्पादन खर्च सुमारे १५ टक्क्यांनी वाढला आहे. मात्र, जीएसटीमुळे ग्राहकांवर प्रत्यक्ष परिणाम सुमारे ५ टक्क्यांचा राहू शकतो.

## एसआयआरवर सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपाची मागणी; २ हजारांहून अधिक नागरिकांचे सरन्यायाधीशांना खुले पत्र

### निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप; ईसीआयनेटचे स्वतंत्र ऑडिट आणि मतदार नोंदणीतील कथित अनधिकृत बदलांची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण अर्थात एसआयआरच्या प्रक्रियेवरून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत नवा वाद निर्माण झाला आहे. देशभरातील दोन हजारांहून अधिक नागरिकांनी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि सर्वोच्च न्यायालयातील इतर न्यायमूर्तींना खुले पत्र लिहून एसआयआर प्रक्रियेबाबत तातडीच्या न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी केली आहे. या पत्रावर शिक्षणतज्ज्ञ, वकील, पत्रकार, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आणि माजी सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

नागरिकांनी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या एसआयआरशी संबंधित प्रशासकीय आणि कार्यकारी निर्णयांची स्वतः हून म्हणजेच सुओ मोटो दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे. तसेच, कायदेशीर वैधता आणि प्रक्रियेची निष्पक्षता यांचा स्वतंत्र न्यायालयीन आढावा पूर्ण होईपर्यंत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील एसआयआरला तातडीने स्थगिती देऊन ती रद्द करण्याची मागणी पत्रात करण्यात आली आहे.

मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या अर्जांमध्ये आणि मतदार यादीशी संबंधित सॉफ्टवेअरमध्ये कथित अनधिकृत बदल करण्यात आल्याचा आरोपही पत्रात करण्यात आला आहे. विशेषतः ईसीआयनेट या केंद्रीकृत प्रणालीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करत, स्थानिक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या अधिकारांवर त्याचा परिणाम होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. गोव्यात ९७ मतदारांची कागदपत्रे तपासून नावे मंजूर करण्यात आल्यानंतर सॉफ्टवेअर लॉकमुळे ती अंतिम यादीत पुनर्स्थापित करता आली नसल्याचा दावा पत्रात करण्यात आला आहे. हे आरोप अद्याप स्वतंत्रपणे सिद्ध झालेले नाहीत.

नागरिकांनी ईसीआयनेटचे स्वतंत्र सुरक्षा आणि कायदेशीर ऑडिट, तसेच कथित सॉफ्टवेअर आणि अर्जातील बदलांची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी केली आहे. एसआयआरदरम्यान तांत्रिक त्रुटी, सॉफ्टवेअर लॉक किंवा प्रक्रियात्मक बदलांमुळे नावे वगळली गेल्याचे आढळल्यास संबंधित मतदारांची नावे तातडीने पुनर्स्थापित करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# 'बिग बॉस मराठी' फेम दिव्या शिंदेविरुद्ध पुण्यात गुन्हा दाखल; निवृत्त डॉक्टरांना मारहाण करून ५ लाखांची खंडणी मागितल्याचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

'बिग बॉस मराठी'ची माजी स्पर्धक आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर दिव्या शिंदे हिच्यासह तिच्या साथीदारांवर एका निवृत्त शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याला घरात घुसून बेदम मारहाण केल्याप्रकरणी तसेच ५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी पुणे शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. 'न्याती हाईलँड्स' येथे गुरुवारी रात्री ही घटना घडली. या प्रकरणी डॉ. विद्याधर गायकवाड (वय ६५) यांनी शुक्रवारी काळेपडळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. द इंडियन एक्सप्रेसने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.

नेमके प्रकरण काय?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. गायकवाड हे २०२१ मध्ये पुणे कॅन्टोन्मेंट रुग्णालयातून वैद्यकीय अधिकारी म्हणून निवृत्त झाले आहेत. ते 'करुणादीप फाउंडेशन'चे सदस्य असून या संस्थेने १ ते ३ सप्टेंबर दरम्यान बालगंधर्व रंगमंदिरात 'कला आविष्कार महोत्सव' आयोजित केला होता.

डॉ. गायकवाड यांचे बंधू महेंद्र यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कार्यक्रमासाठी दिव्या शिंदे हिला अधिकृत निमंत्रण नव्हते; तरीही ती या कार्यक्रमाला उपस्थित राहिली आणि तिने सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर म्हणून उपस्थितांशी संवाद साधला. माझ्यामुळेच या कार्यक्रमाला प्रसिद्धी मिळाली, असा दावा करत तिने ५ लाख रुपयांची मागणी सुरू केली. डॉ. विद्याधर यांनी तिला 'गुगल पे'द्वारे सुमारे ५० हजार रुपये पाठवलेही होते, मात्र तरीही ती उर्वरित पैशांसाठी सातत्याने दबाव आणत होती, असा आरोप महेंद्र यांनी केला आहे.

एफआयआरमधील माहितीनुसार, १७ सप्टेंबर रोजी दिव्या शिंदे, अण्णा ढमढेरे व इतर काही जण डॉ. गायकवाड यांच्या मोहम्मदवाडी येथील घरी गेले आणि त्यांनी ५ लाखांची मागणी केली. त्यानंतर २३ सप्टेंबर रोजी ढमढेरे याने डॉ. गायकवाड यांना धमकी दिली की, पैसे दिले नाहीत तर घरी माणसे पाठवून मारहाण केली जाईल. त्यावर डॉ. गायकवाड यांनी आपण अर्धांगवायूने ग्रस्त असून संस्थेच्या आर्थिक व्यवहारांशी आपला काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले होते.

तरीही गुरुवारी रात्री साडेआठच्या सुमारास दिव्या शिंदे आणि तिचे साथीदार डॉ. गायकवाड यांच्या घरात घुसले. त्यांनी लाकडी काठी, बेल्ट आणि पाण्याच्या तांब्याने डॉ. गायकवाड यांना बेदम मारहाण केली. घरातील वस्तूंची तोडफोड करत ५ लाख रुपये न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच त्यांच्या मुलालाही धमकावण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच महेंद्र यांनी पोलिसांसह घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या डॉ. गायकवाड यांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

डॉ. गायकवाड यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दिव्या शिंदे, अण्णा ढमढेरे व इतर साथीदारांविरुद्ध खुनाचा प्रयत्न, मारहाण, धमकी आणि खंडणी उकळणे यांसारख्या विविध कलमांखाली भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे.

कोण आहे दिव्या शिंदे?

सोशल मीडियावर 'सरकार' नावाने परिचित असलेली दिव्या शिंदे ही सिंहगड रस्ता परिसरात राहते. तिच्या विविध सोशल मीडिया खात्यांवर १० लाखांपेक्षा अधिक फॉलोअर्स आहेत. बिग बॉस मराठीच्या सहाव्या सीझनमध्ये तिने सहभाग घेतला होता. सोसायटी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असल्याचे काळेपडळ पोलिसांनी सांगितले.

# घटस्फोटानंतर पुन्हा एकत्र आलेल्या दाम्पत्याला हायकोर्टाचा संरक्षणाचा आधार; 'विवाहसंस्थेला गृहीत धरू नका'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

अलाहाबाद : वृत्तसंस्था

घटस्फोट घेतल्यानंतर पुन्हा एकत्र येऊन विवाह करणाऱ्या एका दाम्पत्याच्या शांततापूर्ण वैवाहिक जीवनाचे संरक्षण करण्याचे निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिले आहेत. या दाम्पत्याला दोन मुले असून, परस्पर संमतीने घटस्फोट घेतल्यानंतर त्यांनी संपूर्ण कुटुंबाच्या हिताचा विचार करून पुन्हा विवाह करण्याचा निर्णय घेतला. मात्र, पतीच्या वडिलांना हा विवाह मान्य नसल्याने दाम्पत्याने आपल्या वैवाहिक जीवनात हस्तक्षेप होण्याची भीती व्यक्त करत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

न्यायमूर्ती राजेश सिंह चौहान आणि न्यायमूर्ती राम मनोहर नारायण मिश्रा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने दाम्पत्याच्या वैवाहिक जीवनात अनावश्यक हस्तक्षेप होऊ नये, यासाठी संरक्षण देताना विवाहसंस्थेबाबत महत्त्वाची टिप्पणी केली. 'पवित्र विवाहसंस्था हलक्यात घेता कामा नये', असे न्यायालयाने नमूद केले.

या प्रकरणातील दाम्पत्य यापूर्वी पती-पत्नी होते. त्यांच्या वैवाहिक जीवनातून दोन मुले आहेत. मात्र, काही काळानंतर दोघांनी परस्पर संमतीने घटस्फोट घेतला. त्यानंतरही कुटुंबातील परिस्थिती आणि दोन मुलांचे भवितव्य लक्षात घेऊन दोघांनी पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २ एप्रिल २०२६ रोजी आर्य समाज मंदिरात त्यांनी पुन्हा विवाह केला.

मात्र, पतीच्या वडिलांनी या विवाहाला विरोध केला. त्यामुळे पुन्हा विवाह केलेल्या या दाम्पत्याला आपल्या वैवाहिक आयुष्यात कुटुंबीयांकडून अडथळा निर्माण होण्याची आणि शांततेत जगण्याचा अधिकार बाधित होण्याची भीती वाटू लागली. त्यातून त्यांनी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. याचिकेत त्यांनी वैवाहिक जीवनाचे संरक्षण करण्याबरोबरच त्यांच्या विवाहाची नोंदणी करण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य मिळावे, अशी मागणी केली होती.

या प्रकरणाकडे केवळ कौटुंबिक वाद म्हणून न पाहता, दोन प्रौढ व्यक्तींना आपल्या वैवाहिक जीवनाबाबत निर्णय घेण्याच्या अधिकाराच्या संदर्भातही पाहिले जात आहे. घटस्फोटानंतर पुन्हा त्याच व्यक्तीसोबत विवाह करण्याचा निर्णय हा कायदेशीर प्रक्रियेतून घेतलेल्या पूर्वीच्या घटस्फोटानंतरचा स्वतंत्र वैवाहिक निर्णय असल्याचे या प्रकरणातून स्पष्ट होते.

न्यायालयाने दाम्पत्याला संरक्षण देताना विवाह हा केवळ औपचारिक करार नसून सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांशी जोडलेली संस्था असल्याचे अधोरेखित केले. त्यामुळे विवाह करणे, घटस्फोट घेणे किंवा पुन्हा विवाह करणे या निर्णयांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे न्यायालयाच्या निरीक्षणातून स्पष्ट होते.

विशेष म्हणजे, या प्रकरणात दोन मुलांचा संदर्भही महत्त्वाचा ठरतो. घटस्फोटानंतर वेगळे झालेल्या या दाम्पत्याने कुटुंबाच्या हिताचा विचार करून पुन्हा संसार सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयाला कुटुंबातील एका सदस्याचा विरोध झाल्यानंतर त्यांना न्यायालयीन संरक्षण मागावे लागले. अखेर उच्च न्यायालयाने त्यांच्या शांततापूर्ण वैवाहिक जीवनाच्या संरक्षणासाठी हस्तक्षेप केला.